# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : ०९/०८/२०२३

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

देशात व राज्यात स्वांतत्र्याचा अमृत महोत्सव वर्षाचा उपक्रम संपन्न होत असतानाच, केंद्र सरकारने "मेरी माटी, मेरा देश" या नवीन उपक्रमाची घोषणा केलेली आहे. या घोषणेनुसार प्रत्येक राज्यामध्ये आपल्या मातीविषयी जनजागृती, प्रेम आणि साक्षरता निर्माण व्हावी याबाबत अभियान घेणे अपेक्षित आहे असे नमूद केले आहे.

त्यानुषंगाने मा. प्रशासक तथा आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. "मेरी माटी, मेरा देश" हे उपक्रम राबविण्याकरीता मा. आयुक्त महोदयांनी दिनांक ३१ जुलै, २०२३ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात आली होती.

सदर उपक्रमांतर्गत उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत **दिनांक ०९ ऑगस्ट, २०२३ रोजी सकाळी ०८.३० ते १०.३०** या वेळेत आपल्या शहरात मातीविषयी जनजागृती, प्रेम आणि साक्षरता निर्माण व्हावी याकरीता महानगरपालिका क्षेत्रात प्रभात फेरी काढण्याबाबत नियोजित करण्यात आले होते व त्याबाबत उमपा शाळेतील सर्व मुख्याध्यापक / शाळेचे प्रतिनिधी यांना दिनांक ०८ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये अवगत करण्यात होते.

त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेतील शाळा क्र. ३, ४, ५, ७, ८, ९, १२, १३, १४, १७, १८, १९, २१, २३, २४, २५, २६, २७, २८, २९ व ३० चे विद्यार्थी, मुख्याध्यापक / शाळेचे प्रतिनिधीसह उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत मा. आयुक्त श्री. अजीज शेख यांच्या मार्गदर्शनानुसार प्रभात फेरी काढण्यात आली. सदर प्रभात फेरीकरीता डॉ. सुभाष जाधव उप आयुक्त (शिक्षण), श्री. दिपक धनगर प्रशासन अधिकारी (शिक्षण) व श्रीमती निलम कदम उप-लेखा अधिकारी (शिक्षण) हे उपस्थित होते.

सदर प्रभात फेरी दरम्यान सर्व उल्हासनगर महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट रित्या प्रतिसाद दिला असून, **"माझी माती माझा देश"** या कार्यक्रमांतर्गत हातामध्ये माती घेऊन किंवा मातीचे दिवे घेऊन शपथ घेण्यात आली व शहरात मातीविषयी जनजागृती, प्रेम आणि साक्षरता निर्माण करण्यात आली.

9/8/23

(छाया प्रकाश डागळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
   सदरची प्रेसनोट उल्हासनगर महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.